|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

( पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव )

**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

**जा.क्र.कबचौउमवि/७-अ/४९५/२०२१** **दिनांक: १८/०२/२०२१**

प्रति,

१) **कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक**

२) **कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख**

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षेच्या Mock Test/सराव चाचणीसंदर्भात.......

संदर्भ : १) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/४३५६/२०२०, दिनांक २९.१२.२०२०.

२) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/११९/२०२१, दिनांक ०९.०१.२०२१.

महोदय/महोदया,

विद्यापीठाच्या संदर्भांकित पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षेच्या आयोजनाबाबतच्या सुचना कळविण्यात आल्या होत्या. सदर परीक्षांच्या अनुषंगाने Mock Test च्या आयोजनाबाबतची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या नियमित सत्र-१ च्या पदवी व पदविका स्तरावरील प्रथम वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान, प्रथम वर्ष समाजकार्य (B.S.W.), पदवी स्तरावरील व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रम, डी.पी.ए., बी.ए.एम.सी.जे., बी.पी.ई. आणि बी.व्होक. या अभ्यासक्रमांच्या परीक्षा ह्या दिनांक ०२ मार्च, २०२१ पासून सुरु होणार असून, विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र.०२ मध्ये Mock Test/ सराव चाचणी संदर्भात नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार Mock Test/ सराव चाचणी घेण्यात येणार आहे. तरी यासंदर्भात सर्व विद्यार्थ्यांना सूचित करावे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेबाबत व्यवस्थित माहिती व्हावी तसेच परीक्षा देतांना त्यांना काही अडचणी येऊ नयेत, याकरिता विद्यार्थ्यांनी Mock Test/सराव चाचणी देणे आवश्यक आहे.

तसेच सदर हिवाळी परीक्षेच्या अनुषंगाने मा. प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, महाविद्यालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या Co-ordinator यांना, सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची जास्त संख्या लक्षात घेता, दिनांक ०२.०३.२०२१ पासून विद्यार्थ्यांना येणा-या सर्व अडचणींचे निराकरण तसेच मार्गदर्शन करण्यासंदर्भात व कोणताही विद्यार्थी सदर परीक्षेपासून वंचित राहणार नाही या संदर्भात सर्वतोपरी सहकार्य करण्याविषयी त्यांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

तरी उपरोक्तबाबत कृपया नोंद घेऊन, सदर बाब सर्व संबंधित विद्यार्थी तसेच सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन, विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

**(भ. प्र. पाटील)**
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव Formerly North Maharashtra University, Jalgaon )
1990 'A' Grade NAAC Re-Accredited (3rd Cycle)

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/7-अ/119/2021 दिनांक: 09/01/2021

प्रति,

1. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक
2. कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि शैक्षणिक विभागांचे प्रमुख

**विषय :-शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील हिवाळी परीक्षेच्या MOCK TEST/सराव चाचणी संदर्भात**

**संदर्भ** :- 1. विद्यापीठाचे पत्र क्र. कबचौउमवि/7-अ/4356/2020, दिनांक 29.12.2020

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरुन, शैक्षणिक वर्ष 2020-21 मधील हिवाळी परीक्षांचे आयोजन दिनांक 05 जानेवारी, 2021 पासून फक्त ऑनलाईन माध्यमाव्दारे वस्तुनिष्ठ बहुपर्यायी (MCQ) स्वरुपात Smart Phone/ Laptop/ Desktop with web camera याद्वारे सुरु झालेल्या आहेत. सदर हिवाळी परीक्षेच्या आयोजनाबाबतच्या सुचना वरील संदर्भीय पत्रानुसार कळविण्यात आलेल्या होत्या. **यात सुचना क्र. 4 मध्ये** विद्यार्थ्यांसाठी Mock Test चे आयोजन करण्यात येणार असून त्याची माहीती वेळोवेळी संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता विद्यार्थ्यांनी वेळोवेळी संकेतस्थळाला भेट द्यावी. सुरुवातीला 5 जानेवारी 2021 पासून ज्या परीक्षेचे आयोजन केलेले आहे. त्या विद्यार्थ्यांच्या MOCK TEST ला सुरुवात होईल. तद्‌नंतर टप्प्याटप्प्याने इतर वर्गांच्या MOCK TEST चे आयोजन केले जाईल. याबाबतची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर वेळोवेळी उपलब्ध होईल. असे यापूर्वी कळविण्यात आलेले आहे.

त्यानुसार कळविण्यात येते की, दिनांक 19.01.2021 पासून कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रमाअंतर्गत सत्र 1 चे बॅकलॉग व सत्र 3 व 5 चे नियमित / बॅकलॉग, विधी, औषधनिर्माणशास्त्र इ. विद्यार्थ्यांच्या MOCK TEST सुरु झालेल्या असून या करिता विद्यार्थ्यांनी परीक्षेसाठी लॉगीन करण्याकरिता https://nmu.unionline.in या संकेतस्थळावरुन User Name म्हणून PRN. No. टाकावा त्यांनतर पासवर्ड म्हणून जन्मतारीख DDMMYY या स्वरुपात नमुद करावी. सराव परीक्षेंत लॉगीन झाल्यावर आपली शाखा म्हणून Mock_Exam व नंतर आपला अभ्यासक्रम निवडावा. प्रश्नाच्या उत्तर निवडताना A B C D समोरील ● रेडियोबटनवर क्लीक करण्यात यावे. यापध्दतीने परीक्षा दिली तर कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. परीक्षा देतांना काही तांत्रिक अडचण निर्माण झाल्यास सॉप्टवेअरमध्ये उपलब्ध असलेल्या Need Support? या Chatbot द्वारे निराकरण करावे तसेच महाविद्यायातील नेमणूक केलेले परीक्षा समन्वयकाशी संपर्क करावा. तसेच या परीक्षें संदर्भातील अधिकची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावरील होम पेजवर January-2021 Exmination या लिंकवर http://nmu.ac.in/examination.aspx येथे उपलब्ध आहेत.

तरी वरील बाब सर्व संबंधित विद्यार्थी, महाविद्यालयीन शिक्षक व सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून देऊन, विद्यापीठास सहकार्य करावे.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ.प्र.पाटील)
संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत:-माहिती साठी** :

1. मा.कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव 2. मा.प्र-कुलगुरू कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव
3. मा.प्र.कुलसचिव कार्यालय, क.ब.चौ.उ.म.वि., जळगाव 4. मा.प्र.वित्त व लेखा अधिकारी,कबचौउमवि,जळगाव
5. विशेष कार्य अधिकारी, संगणक केंद्र, कबचौउमवि, जळगाव 6. समन्वयक, कबचौउमवि, जळगाव

|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

## Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

(पूर्वीचे उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव)

### परीक्षा व मूल्यमापन मंडळ

जा.क्र.कबचौउमवि/७-अ/१८२/२०२१ दिनांक: १५/०१/२०२१

प्रति,

१) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत सर्व महाविद्यालयांचे मा. प्राचार्य आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे संचालक

२) कबचौउमविंतर्गत सर्व शैक्षणिक प्रशाळांचे मा.संचालक आणि विभागांचे मा.विभागप्रमुख

विषय : शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षेच्या Mock Test/सराव चाचणीसंदर्भात.......

संदर्भ : १) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/४३५६/२०२०, दिनांक २९.१२.२०२०.

२) विद्यापीठाचे पत्र क्र.कबचौउमवि/७-अ/११९/२०२१, दिनांक ०९.०१.२०२१.

महोदय/महोदया,

विद्यापीठाच्या संदर्भांकित पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२०-२१ मधील हिवाळी परीक्षेच्या आयोजनाबाबतच्या सुचना कळविण्यात आल्या होत्या. सदर परीक्षांच्या अनुषंगाने Mock Test च्या आयोजनाबाबतची संपूर्ण माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

त्याचप्रमाणे दिनांक १९.०१.२०२१ पासून कला, विज्ञान, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्राचे अभ्यासक्रमांतर्गत सत्र १ चे बॅकलॉग व सत्र ३ व ५ चे नियमित/ बॅकलॉग, विधी, औषधनिर्माणशास्त्र इत्यादि विद्यार्थ्यांच्या परीक्षा सुरु होणार होणार आहे तसेच दिनांक २३.०१.२०२१ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी परीक्षा सुरु होणार असून, विद्यापीठाच्या संदर्भिय पत्र क्र.०२ मध्ये Mock Test/ सराव चाचणी संदर्भात नमूद केलेल्या कार्यपध्दतीनुसार Mock Test/ सराव चाचणी देणेबाबत सर्व विद्यार्थ्यांना सूचित करावे. विद्यार्थ्यांना ऑनलाईन परीक्षेबाबत माहिती व्हावी तसेच परीक्षा देतांना त्यांना काही अडचणी येऊ नयेत, याकरिता विद्यार्थ्यांनी Mock Test/सराव चाचणी देणे आवश्यक आहे.

तसेच सदर हिवाळी परीक्षेच्या अनुषंगाने मा. प्राचार्यांना विनंती करण्यात येते की, महाविद्यालयामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या Co-ordinator यांना, सदर परीक्षेसाठी प्रविष्ठ झालेल्या विद्यार्थ्यांची जास्त संख्या लक्षात घेता, दिनांक १९.०१.२०२१ पासून विद्यार्थ्यांना येणा-या सर्व अडचणींचे निराकरण तसेच मार्गदर्शन करण्यासंदर्भात व कोणताही विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही या संदर्भात सर्वतोपरी सहकार्य करण्याविषयी त्यांना सूचना देण्यात याव्यात, ही विनंती.

तरी उपरोक्तबाबत कृपया नोंद घेऊन, सदर बाब सर्व संबंधित विद्यार्थी तसेच सर्व संबंधित घटकांच्या निदर्शनास आणून देऊन, विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

(भ. प्र. पाटील)

संचालक,

परीक्षा व मूल्यमापन मंडळ

Scanned with CamSc